I.O

N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT
**(Under Section 154 Cr.P.C.)**
प्रथम खबर अहवाल
**(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)**

1. **District (जिल्हा):** अहमदनगर **P.S.(ठाणे):** राहाता
**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0353 **Year (वर्ष):** 2023
**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 06/07/2023 00:56

| 2. | S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|---|
| | 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**
1. **Day(दिवस):** बुधवार **Date From (दिनांक पासून):** 05/07/2023
**Time Period (कालावधी):** **Date To ( दिनांक पर्यंत):** 05/07/2023
**Time From (वेळेपासून):** 11:35 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 14:17 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिनांक ):** 06/07/2023 **Time (वेळ):** 00:35 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
**Entry No. (नोंद क्र.):** 003
**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 06/07/2023 00:35 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी
5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**
1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
दक्षिण, 1 किमी **Beat No. (बिट क्र.):**
(b) **Address (पत्ता):** राहाता येथील तालुका प्रषासकिय,राहाता

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**

10 Total val
(चोरीस गे
25,0
11.In

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** -प्रभाकर कोंडाजी राऊत

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1967

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | कोल्हार बुद्रुक ता राहाता, राहाता,राहाता ,अहमदनगर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | कोल्हार बुद्रुक ता राहाता, राहाता,राहाता ,अहमदनगर,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):**

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | विकास सुर्यभान दुशिंग | | | 1. शारदानगर, कोपरगाव जि अहमदनगर,कोपरगाव ,राहाता , अहमदनगर,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | त्यात 500/ रुपये दराच्या 50 भारतीय चलनी नोटा | 25,000.00 |

10 **Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रु. मध्ये)):**
25,000.00

11.**Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12.**First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**
.फिर्याद दि.06/07/2023

मी प्रभाकर कोंडाजी राऊत, वय-56 वर्षे, धंदा षेती, रा. कोल्हार बुद्रुक ता. राहाता, जि.अहमदनगर. समक्ष फिर्याद देतो की, मी वरिल पत्यावर कुटुंबासह राहण्यास असुन मी दि.04/07/2023 रोजी पोलीस उप अधीक्षक श्री.लोखंडे यांना फोन करुन एका लोकसेवकाकडुन लाच मागणी होत असले बाबत तक्रार सांगितली. त्यानुसार त्यांनी मला दि.05/07/2023 रोजी 10/30 वा चे सुमारास राहाता येथे सुरक्षित ठिकाणी थांबण्यास सांगितले. त्यानुसार मी सुरक्षित ठिकाणी थांबुन होतो. सकाळी 10/30 वा. दरम्यान मी थांबलो त्या ठिकाणी पोलीस उप अधीक्षक श्री. लोखंडे हे शासकीय वाहनाने तेथे आले. त्यांनी मला माझे नाव गाव विचारले तसेच त्यांची, त्यांच्या सोबतचे स्टॉफ व दोन पंच यांची ओळख सांगितली. त्यानंतर मी श्री. लोखंडे यांचे सुचने वरुन षासकीय वाहनात बसलो व दोन शासकिय पंचासमक्ष लोकसेवकांविरुध्द लाचमागणीची तक्रार सांगितली की, '' मी वरील ठिकाणचा रहिवाशी असुन मी सन 2017 मध्ये बाभळेष्वर बुद्रुक, ता. राहाता जि. अहमदनगर येथील षेत गट नं. /उप विभाग क्र. 65 मध्ये 1 हेक्टर 52 आर शेती विकत घेतलेली आहे. सदर षेती क्षेत्राचे मी खाजगी मोजणी केली असता, सदरचे क्षेत्र हे 32 आर कमी भरले. त्यामुळे मी सदर क्षेत्राची मोजणी होणेकरीता सन 2022 मध्ये मा. दिवाणी न्यायालय, राहाता येथे अर्ज दाखल केला होता. त्याचा नियमित दिवाणी दावा क्र. 151/2022 असा आहे. सदर दिवाणी दाव्यामध्ये मा. न्यायालयाने दि. 04/02/2023 रोजी उप अधीक्षक,भुमि अभिलेख कार्यालय, राहाता यांना दि.10/03/2023 रोजी पावेतो सदर शेत जमिनीचा नकाशा व रिपोर्ट सादर करण्याबाबत आदेशित केले होते. त्यानुसार मी भुमि अभिलेख कार्यालय राहाता येथे जावुन श्री. दुषिंग यांची भेट घेतली होती. त्यानंतर दि. 20/06/2023 रोजी श्री. दुशिंग यांनी माझे क्षेत्राची मोजणी करुन नकाशा तयार केला होता, त्यावेळी मी त्यांना नकाशा व रिपोर्ट लवकर कोर्टात पाठविणेबाबत सांगितले होते. त्यानंतर दि. 02/07/2023 रोजी मी भुमि अभिलेख कार्यालय, राहाता येथे जावुन श्री. दुशिंग यांची भेट घेतली होती त्यावेळी मी नकाशा व रिपार्ट कोर्टात सादर केला अगर कसे याबाबत विचारणा केली असता त्यांनी मला तुमचे काम खुप किचकट आहे, मी जर रिपार्ट तुमच्या विरुध्द पाठविला तर तुमचे नुकसान होईल, तुमच्या बाजुने जर रिपोर्ट पाठवायचा असेल तर तुम्ही मला 25,000/- रुपये दया असे म्हणुन माझेकडे लाचमागणी केली, त्यांना मला लाच देण्याची ईच्छा नाही अशी तक्रार सांगितली. त्यावेळी श्री. लोखंडे यांचे सुचनेवरुन सदरची तक्रार मी स्वहस्ताक्षरात लिहुन दिली. त्यावर मी, दोन्ही पंचांनी व श्री. लोखंडे यांनी सही केली.

त्यानंतर मी दुशिंग यांचे विरूध्द नोंदविलेल्या लाचमागणी तक्रारीची पडताळणी करण्याचे ठरले. पोलीस उप अधीक्षक श्री. लोखंडे यांनी लाचमागणी पडताळणी कारवाईत व्हाईस रेकॉर्डरचा वापर करण्यात येणार असले बाबत कळवून त्याच्या वापराबाबत माहिती समजावून सांगितली. त्यानंतर पोलीस उप अधीक्षक श्री. लोखंडे यांचे सुचनेप्रमाणे पोकॉ निमसे यांनी व्हाईस रेकॉर्डर मध्ये एक नवीन मेमरीकार्ड घालून, व्हाईस रेकॉर्डर चालू करून, त्या मेमरीकार्डमध्ये काहीही रेकॉर्ड नसल्याची माझी व दोन्ही पंचाची खात्री करून दिली. त्यानंतर पोकॉ निमसे यांनी व्हॉईस रेकॉर्डर चालु करून त्यामध्ये पोलीस उप अधीक्षक श्री. लोखंडे, दोन्ही पंच व मी निवेदन केले. त्यानंतर पोलीस उप अधीक्षक श्री. लोखंडे यांनी लाचमागणी पडताळणी दरम्यान करावयाचे कारवाई बाबत मला व पंच नं.1 यांना सुचना समजावुन सांगितल्या. त्यानंतर पोकॉ निमसे यांनी व्हॉईस रेकॉर्डर चालु करून तो माझे ताब्यात दिला. पोलीस उप अधीक्षक श्री.लोखंडे यांनी मला पंच नं 1 यांचेसह माझे चारचाकी वाहनाने रवाना केले त्याप्रमाणे आम्ही रवाना झालो. मी व पंच नं. 1 असे उपअधीक्षक भूमिअभिलेख कार्यालय, राहाता येथे जावुन दुषिंग यांची भेट घेतली. मी त्यांना रिपोर्ट पाठवला का असे विचारले, त्यावर दुशिंग एवढया लवकर होत नसते, गडबड करुन नाही जमत, असे म्हणाले. त्यावेळी दुषिंग यांनी पंच क्र. 1 यांचेबाबत विचारले असता मी त्यांना माझा भाचा आहे असे सांगितले. त्यावेळी दुशिंग यांनी पंच क्र.1 यांना बाहेर थांबण्यास सांगीतले. त्यानंतर दुशिंग व माझ्यात माझे कामाचे अनुशंगाने

चर्चा झाली. त्या चर्चेदरम्यान दुषिंग यांनी माझ्या जमीनीचा नकाषा व रेकॉर्ड कोर्टात पाठविण्यासाठी माझ्याकडे 25,000/-रुपये लाच मागणी केली त्यावेळी मी त्यांना एक तासाने येतो असे म्हणालो असता त्यांनी मला येण्याअगोदर फोन करा असे सांगितले. त्यानंतर मी व पंच नं. 1 असे त्याठिकाणाहुन निघुन माझे चारचाकी वाहनातुन सापळा पथक थांबले त्याठिकाणी परत आलो. त्यावेळी पोउपअधी.श्री.लोखंडे यांनी मला घडलेल्या हकीकतीबाबत विचारली असता मी त्यांना वरीलप्रमाणे हकीकत सांगितली. त्यानंतर पोउपअधी.श्री. लोखंडे यांनी पंचासमक्ष व्हॉईस रेकॉर्डींग मध्ये रेकॉर्ड झालेले संभाशण ऐकले असता दुशिंग यांनी माझ्या जमीनीचा नकाषा व रेकॉर्ड कोर्टात पाठविण्यासाठी माझ्याकडे 25,000/-रुपये लाच मागणी केल्याचे निश्पन्न झाले. त्यानंतर दुषिंग यांचे विरूध्द लाचेचा सापळा लावण्याचे ठरले. लाच रक्कम म्हणुन देण्यासाठी मी माझ्या बचतीतुन 25,000/-रुपये त्यात 500/- रुपये दराच्या 50 भारतीय चलनी नोटा हजर केल्या. पोउपअधी.श्री. लोखंडे यांनी सदर सापळा कारवाईमध्ये अँन्थ्रासिन पावडर व अल्ट्राव्हायलेट दिव्याचा वापर करण्यात येणार असल्याचे सांगुन त्याबाबतचे प्रात्यक्षिक करून दाखविण्यात आले. मी हजर केलेल्या नोटांना अँन्थ्रासिन पावडर लावण्यात आली व सदर लाच रक्कम माझ्या ताब्यात दिली. पो.उपअधी.श्री. लोखंडे यांनी सापळा कारवाईबाबत मला व सापळा पथकास आवष्यक त्या सुचना दिल्या. पोकॉ निमसे यांनी व्हॉईस रेकॉर्डरमध्ये नवीन मेमरी कार्ड टाकले. त्यावेळी मी दुशिंग यांचे सांगण्याप्रमाणे त्यांचे मोबाईलफोनवर फोन केला व ऑफिसला आहेत का असे विचारले असता त्यांनी हो असे म्हणाले. त्यानंतर मी येतो असे म्हणालो असता दुशिंग यांनी बर बर ठिक आहे असे म्हणाले.त्यानंतर मी फोन कट केला. सदरचा फोन व्हॉईस रेकॉर्डमध्ये रेकॉर्ड करण्यात आला. त्यानंतर पोकॉ निमसे यांनी व्हॉईस रेकॉर्डर चालु करुन माझ्या ताब्यात दिला व पंच क्र. 1 सह मला माझे चारचाकी वाहनाने दुषिंग यांनी मागणी केलेली लाच रक्कम देण्यासाठी उप अधीक्षक भुमि अभिलेख कार्यालय,राहाता येथे रवाना केले. आमचे पाठोपाठ पो.उपअधी.श्री. लोखंडे, पंच नं. 2 व सापळा पथक असे शासकिय वाहनाने आले. मी व पंच नं. 1 प्रशासकिय इमारतीच्या जिन्याने पायी चालत तिस-या मजल्यावरील उपअधीक्षक भूमि अभिलेख कार्यालयासमोर गेलो. आमचे पाठोपाठ सापळा पथक व पंच नं. 2 असे सदर कार्यालयाजवळ येवुन आजुबाजुस कोणास संशय येणार नाही अषा रितीने सापळा लावुन थांबुन राहिले. त्यानंतर मी उपअधीक्षक भूमि अभिलेख कार्यालयातील श्री. दुशिंग यांचे कक्षात गेलो. पंच क्र.1 हे सदर कक्षाच्या दरवाज्यात उभे होते. त्यावेळी मी दुशिंग यांना, मी पैसे घेवुन आलो आहे असे म्हणालो असता ते थांबा म्हणाले.त्यामुळे मी त्यांच्या कक्षात थोडा वेळ थांबुन राहिलो.त्यानंतर थोडया वेळाने दुशिंग मला खाली जावु असे म्हणाले त्यानुसार मी व पंच क्र1 असे त्यांचे बरोबर पाय-याने खाली येत असतांना पाय-यावर पैश्याची मागणी केली. त्यावेळी मी माझेकडील अँन्थ्रासीन पावडर लावलेली लाच रक्कम त्यांचे समोर धरली असता त्यांनी ती लाच रक्कम त्यांच्या उजव्या हाताने घेवुन त्यांचे पँटचे उजवे खिष्यात ठेवली व बोलत बोलत मी, पंच क्र 1 व दुशिंग असे इमारतीतुन बाहेर आलो व इमारतीच्या मुख्य प्रवेशव्दाराजवळ येवुन मी सापळा पथकास लाच स्वीकारल्याचा पुर्वनियोजीत इशारा केला, त्यावेळी सापळा पथकाने दुशिंग यांना 14/17 वाजेचे सुमारास पकडले. त्यावेळी पो. उपअधी.श्री लोखंडे यांनी त्यांना त्यांचे नाव व पत्ता विचारला असता त्यांनी त्यांचे नाव विकास सुर्यभान दुशिंग, वय 51 वर्शे, धंदा नोकरी, अभिलेखपाल, उप अधीक्षक भुमी अभिलेख कार्यालय, राहाता, ता. राहाता, जि. अहमदनगर रा. शारदानगर, कोपरगाव जि. अहमदनगर असे सांगीतले. पो.उपअधी.श्री लोखंडे यांनी दुशिंग यांचे ताब्यातुन सदरची लाचेची रक्कम पंचासमक्ष ताब्यात घेतली. त्यानंतर पो.उपअधी.श्री लोखंडे व सापळा पथक दुशिंग यांना त्यांचे कार्यालयात घेवुन गेले, त्यांचे पाठोपाठ मी देखील त्यांचे कार्यालयात गेलो, त्याठिकाणी दुशिंग यांच्या पंचासमक्ष चाचण्या घेण्यात आल्या. त्यानंतर पंचनाम्याचे पुढील कामकाज राहाता पोलीस स्टेषन येथे करण्याचे ठरले. पो.उपअधी.श्री लोखंडे यांचे सुचनेवरून मी माझ्या चारचाकी वाहनाने व सापळा पथक दुशिंग यांचेसह शासकिय वाहनाने राहाता पोलीस स्टेशन येथे आले व त्याठिकाणी सापळा कारवाईचे पुढील कामकाज करण्यात आले. त्याठिकाणी मी पो.उपअधी.श्री लोखंडे यांचे समक्ष माझी फिर्याद दिली.

तरी दि. 05/07/2023 रोजी 11/35 वा. ते 14/17 वा. च्या दरम्यान लाचमागणी पडताळणी व सापळा कारवाईच्या वेळी यातील लोकसेवक विकास सुर्यभान दुशिंग यांनी माझे बाभळेष्वर बुद्रुक ता. राहाता येथील षेत गट नं./उप विभाग नं.65 मधील शेत जमिनीचा नकाशा व रिपोर्ट मा. दिवाणी न्यायालय राहाता येथे देणेकरीता माझेकडे 25,000/-रुपये लाचेची मागणी करून, ती लाचेची रक्कम लोकसेवक दुशिंग यांनी राहाता येथील तालुका प्रषासकिय इमारतीच्या पाय-यावर स्विकारुन स्वतःचा सांपत्तीक फायदा करून घेवुन गुन्हेगारी स्वरूपाचे वर्तन केले म्हणुन माझी लोकसेवक विकास सुर्यभान दुशिंग, वय- 51 वर्शे धंदा नोकरी, अभिलेखपाल, वर्ग-3, उप अधीक्षक भुमी अभिलेख कार्यालय, राहाता, ता. राहाता, जि. अहमदनगर रा. शारदानगर, कोपरगाव जि. अहमदनगर यांचे विरूध्द कायदेशीर फिर्याद आहे.

**13. Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाई: बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

**(1) Registered the case and took up the investigation:**
**(प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):**

kailas fakirba wagh(I (Inspector)) / **or (किंवा)**

**(2) Directed (Name of I.O.) (तपास अधिका-याचे नाव):**

**Rank** (पद): **No.(क्र.):**

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or (किंवा)**

**(3) Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)**:**

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

**(4) Transferred to P.S.**
**(**गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव**):**

**District** (जिल्हा)**:**

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) **.**

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

**14 Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा)**:**

**15. Date and time of dispatch to the court**
**(**न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ**):**

पोलीस ठाणे अंमलदार
राहाता पोलीस स्टेशन

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name (**नाव**):** kailas fakirba wagh
**Rank(**पद**):** I (Inspector)
**No.(**सं.**):**